**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**TERM - I (2022-2023)**

**STD: VI** **MARKS 40**
**SUB : MARATHI** **TIME – 2 Hrs.**

---

**प्र.१)खालील उतारा वाचून प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

जलालुद्दीन फारसा शिकला नाही ,पण त्याने अब्दुल कलामना मात्र शिकण्यासाठी सदैव प्रोत्साहन दिले. रामेश्वरम बेटावर इंग्रजी जाणणारा तो एकटाच माणूस होता. त्यानेच अब्दुलना नवनव्या वैज्ञानिक शोधांबद्दल, साहित्य कला, आधुनिक उपचार पद्धतीबद्दल ओळख करून दिली. त्यांचे एस. टी. आर माणिकन् नावाचे एक मूळ क्रांतिकारक राष्ट्रभक्त होते. त्यांच्याकडे पुस्तकांचा संग्रह होता. त्यांनी कलामला पुस्तक वाचण्यासाठी सदैव उत्तेजित केले. शमसुद्दीन नावाच्या दूरच्या भावाचा कलामांव प्रभाव होता. तो रामेश्वरममध्ये वर्तमानपत्राचा वितरक होता. रेल्वेने पंबन गावाहून वर्तमानपत्राचे गठ्ठे येत आहेत. शमसुद्दीन त्याचे वाटप करी. दिनमणी हे सर्वात लोकप्रिय तमीळ वृत्तपत्र होते. १९३९ मध्ये महायुद्ध पेटीवर पंबन गाडी रामेश्वरम येथे चालत्या गाडीतून ते गठ्ठे फेकले जात. ते या कामात शमसीनला कलाम मदत करू लागले अब्दुल कलामच्या आयुष्यातील ती पहिली कष्टाची कमाई!

प्रश्न १) वर्तमानपत्राचे गठ्ठे कोठून येत होते ?
२) रामेश्वर बेटावर इंग्रजी जाणणारा एकटा मनुष्य कोण होता?
३) उताऱ्यात आलेले सर्वात लोकप्रिय वृत्तपत्राचे नाव काय होते?
४) जलाउद्दीन ने अब्दुल कलामांना कशाशी ओळख करून दिली?

**ब. खालील कविता वाचून प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

ताई दादा मजेत उठती अभ्यासाने हुशार होती
खूप तयाचे कौतुक करिती ते काका काकू!
सुट्टीचा तो काळ मजेचा शेतामध्ये हुंदडण्याचा
काजू ,आंबे ,फणस ही देती ते मामा मामी !
संध्याकाळी खेळ खेळुनी दमून भागुनी घरी येऊनी
शुभम करोति म्हणून घेती ते नाना नानी!
कुटुंब आमचे एक दिलाचे नाते जपते आपुलकीचे
सुखदुःखातही एक राहतो आम्ही भाग्याचे!

प्रश्न १) मुलांना मामा मामी काय खायला देतात?
२) आम्ही भाग्याचे आहोत असे मुले का म्हणतात?
३) शेतामध्ये हुंदडण्याचा काळ कोणता ?
४) अभ्यासाने हुशार कोण होते?

**प्र २.अ)खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन)** **(४)**

१) सचिनच्या मते यशाचे खरे गमक काय?
२) पार्थ, जॉन, सुरेंद्र व शकील यांच्यात मतभेद का झाले?
३) पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही काय कराल?

**ब. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही तीन)** **(३)**

१) सचिनचे गुरु कोण होते ?
२) मुलांकडून शुभम करोति कोण म्हणून घेते?
३) घट्ट नाते कशाचे आहे?
४) पार्थ, जॉन, सुरेंद्र, शकील हे कोणत्या इयत्तेत शिकत होते?

**क.खालील कवितेच्या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.** **(२)**

कुटुंब आमचे एक दिलाचे,नाते जपतो आपुलकीचे!
सुखदुःखातही एक राहतो, आम्ही भाग्याचे !

**प्र.३.अ)कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१) "मी शेवटच्या रेषेपर्यंत धावून शर्यत जिंकली"
२) चुकांचे मी परीक्षण, चिंतन करतो.

**ब. रिकाम्या जागा भरा.** **(३)**

(वार्षिक, हुंदडण्याचा, स्वयंअनुशासन)
१) ________ हेच यशाचे खरे गमक
२) सुट्टीचा तो काळ मजेचा शेतामध्ये________
३) नुकतीच त्यांची ______परीक्षा संपली.

**क. खालील वाक्यप्रचारापासून वाक्य तयार करा .** **(२)**

१) समतोल आहार २)मन हेलावले

**प्र.४.अ)समानार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन)** **(२)**

१) घर - २) प्रवीण- ३) पारितोषिक –

**ब. विरुद्धार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन)** **(२)**

१) हुशार × २) मानवता × ३) अडाणी ×

**क.वचन बदला.(कोणतेही दोन)** **(२)**

१) मडका २) अनेक ३) आंबे

**प्र.५.अ)खालील अधोरेखित शब्द नाम आहे की सर्वनाम ते ओळखा.** **(१)**

१) **<u>तू</u>** अभ्यास करायला हवा, नाहीतर **<u>परीक्षेत</u>** नापास होशील .

**ब.खालील शब्दांचे नाव व सर्वनाम यात वर्गीकरण करा.** **(२)**

( झाड, हा ,वर्तमानपत्र ,माझा )
नाव - ……….        सर्वनाम - ……….

**क.खालील वाक्याचे काळ ओळखा.** **(२)**

१) यश मिळवण्यासाठी मेहनत करायला हवी
२) सचिन काका काकूंकडे राहायला गेला होता.

**क. खालीलपैकी कोणतीही एक कृती करा .** **(५)**

१)'आयुर्वेदिक काढा'-
वैशिष्ट्य-१) लहानांपासून मोठ्यांपर्यंत
२) रोगप्रतिकारक शक्ती वाढते
३) कमी किमतीत
४) 32 आयुर्वेदिक जडीबुटी पासून बनलेला
या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.

२) खालील विषयावर पत्र लेखन करा.
समीर कारखानिस,समर्थ विद्यालय, नागपूर येथून आपल्या शाळेच्या नृत्य स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी शाळेच्या शिक्षकांना विनंती पत्र लिहतो.